6879

जा.क्रं.नावाशमनपा/आस्था-सेल/ /2015
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड
दिनांकः- 27.08.2015

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड येथील कंत्राटी पध्दतीने एकत्रीत वेतनावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात <u>" कंत्राटी कुस्ती शिक्षक " पदासाठी</u> खालील शैक्षणिक अर्हता/पात्रता धारक इच्छुक व पात्र उमेदवारांकडुन खालील वेळापत्रका प्रमाणे <u>थेट मुलाखतीसाठी (Walk In Interview)</u> अर्ज मागविण्यात येत आहे.

| अर्ज स्विकारण्याचे व <u>थेट मुलाखतीचे</u> वेळापत्रक | |
|---|---|
| अर्ज स्विकारण्याचा दिनांक/वेळ<br>(टिपः- अर्ज पोस्टाने अथवा कुरीअरने स्विकारले जाणार नाहीत) | दिनांक 11/09/2015 ~~पासुन दिनांक~~ रोजी सकाळी 10.30 वा. ते दुपारी 12.30 वा. पर्यंत. |
| थेट मुलाखतीचा दिनांक व वेळ | दिनांक 11 / 09 /2015<br>~~सकाळी~~ सायं 04.00 वाजता |
| अर्ज स्विकारण्याचे व थेट मुलाखतीचे स्थळ | स्थळ - नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड मुख्य प्रशासकीय ईमारत, प्रशिक्षण हॉल 3 रा माळा, श्री गुरुगोंविदसिंघजी शासकीय रुग्णालया-समोर, वजीराबाद, नांदेड. |

| अ.क्र. | पदाचे नांव | पद संख्या | वेतन | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|---|
| 1 | कंत्राटी कुस्ती शिक्षक/प्रशिक्षक | 01 | एकत्रीत वेतन रु. 7,000/- | अ) इयत्ता 7 वी उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>ब) कुस्ती खेळण्याचा कमीत कमी 5 वर्षाचा अनुभव आवश्यक. |

1. <u>जाहिरातीत विहित केलेली शैक्षणिक अर्हता, वय, अनुभव, जातीचा दाखला, जात वैधता प्रमाणपत्र व इतर आवश्यक प्रमाणपत्राच्या स्वसाक्षंकित केलेल्या छायांकित प्रती, पासपोर्ट साईज दोन फोटो थेट मुलाखतीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.</u>
2. निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर उमेदवारांने चुकीची माहिती / प्रमाणपत्र / कागदपत्रे सादर केल्याचे / दिशाभुल केल्याचे अथवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी/निवड/नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात/ संपुष्टात आणण्यात येईल.
3. उमेदवारास थेट मुलाखतीसाठी स्वखर्चाने यावे लागेल व त्याबाबत कोणत्याही प्रकारचा मोबदला देण्यात येणार नाही.

4. नियुक्ती आदेशान्वये सेवेत रुजू होताना उमेदवारांना महाराष्ट्र शासन निर्णय क्रं.-संकीर्ण-2015/प्र.क्र.227/नवि-20 दि.5 ऑगस्ट 2015 मधील तरतुदी नुसार स्वघोषणापत्र (self Declaration) घेण्यात येईल.
5. निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र ठरलेल्या उमेदवारांशी कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केला जाणार नाही.
6. **पद भरतीच्या प्रक्रियेत कोणत्याही टप्प्यावर, कोणतेही कारण न देता स्थगीत/रद्द अथवा त्यात बदल करण्याचे अधिकार आयुक्त नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका ,नांदेड यांनी राखुन ठेवले आहेत.**
7. **उमेदवाराने निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर निवडी संबधात कोणत्याही प्रकारची शिफारस अथवा दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास संबंधीतास अपात्र ठरविण्यात येईल किंवा निवड रद्द करण्यात येईल.**
8. उमेदवाराने जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयात नांव नोंदणी केली असल्यास सदर नोंदणी कार्डची स्वसाक्षांकित प्रत सोबत जोडणे आवश्यक राहील.
9. **थेट मुलाखतीतील गुणानुक्रमे पात्र ठरलेल्या उमेदवारांची शैक्षणिक अर्हतेचे मुळ कागदपत्राच्या स्वसाक्षंकीत प्रति तपासुन त्यामध्ये त्रुटी आढळल्यास त्यांच्या गुणाचा विचार न करता सदर उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल व त्या खालील गुणानुक्रमे पात्र उमेदवारांची निवड करण्यात येईल.**

<u>निवड यादी:-</u>

1. **सदरची निवड यादी एक वर्षा पर्यंत अस्तित्वात राहील.**

<u>इतर अटी व शर्ती:-</u>

1. **वयोमर्यादा :-** उपरोक्त पदांसाठी **अर्जदाराचे वय जाहीरात प्रसिध्दीच्या दिनांकास 18 ते 33 वर्ष व (मागासवर्गीय उमेदवारांसाठी किमान** वयोमर्यादेत 5 वर्षापर्यंत वयाची अट शिथिल राहील) व माजी सैनिक, अंशकालीन कर्मचारी व प्रकल्पग्रस्त/ भुकंपग्रसत ,खेळांडू इ. उमेदवारांसाठी शासन निर्णयानुसार वयोमर्यादा राहील. तथापि त्या बाबतचे प्रमाणपत्र थेट मुलाखतीसाठीच्या अर्जा सोबत सादर करणे आवश्यक राहील.
2. वयाकरीता शाळा सोडल्याचा दाखला(टी.सी) अथवा माध्यमिक शालांत (एसएससी) सनद ई. प्रमाणपत्र, सादर करणे आवश्यक राहील.
3. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्रं. एसआरव्ही-2002/379/ प्र.क्र.22/02/12, मंत्रालय मुंबई दिनांक 01 नोंव्हेंबर 2003 मधील तरतुदीनुसार अगोदरच शासन सेवेत असलेल्यांना अधिकारी/कर्मचारी यांचे करीता नामनिर्देशनाने नियुक्तीसाठी **वयोमर्यादा विहित करण्यात** येईल परंतु उमेदवारांनी या बाबत शासकिय सेवेत असल्याचा पुरावा व नाहरकत प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.
4. महाराष्ट्र शासन नागरी सेवा (**लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र**) नियम-2005 अन्वये विहित उमेदवारांनी त्यांचे दिनांक 28.03.2005 अन्वये रोजी हयात असलेली व त्यानंतर जन्माला आलेली अपत्यांची संख्या याबाबत विहित नमुन्यात प्रतिज्ञापत्र लेखी परिक्षेच्या वेळेस सादर करणे बंधनकारक राहील.
5. शासकीय,निमशासकीय सेवेत कार्यरत असणा-या कर्मचा-यांना त्यांचे कार्यलयाचे परवानगीने अर्ज केल्यास अशा कर्मचा-या करिता वयोमर्यादा शिथील राहील.

6. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रं. प्रकल्प-1006/मु.स.396/प्र.क्र.56/06/16-अ मंत्रालय मुंबई दिनांक 3 फेब्रुवारी 2007 अन्वये **प्रकल्पग्रस्त / भुकंपग्रस्त** उमेदवारांसाठी उच्च वयोमर्यादा सरसकट 45 वर्षा पर्यंत शासनाच्या नियमानुसार राहील. तसेच संबंधीत उमेदवारांने प्रकल्पग्रस्त/भुकंपग्रस्त असल्याचे पुरावे लेखी परिक्षेत येतांना सोबत सादर करणे बंधनकारक राहील ते केवळ **वयक्षमापणा बाबत लागु राहील.**
7. उमेदवार महाराष्ट्र **राज्याचा रहिवाशी** असावा त्या बाबतचे सक्षम / प्राधिकृत अधिका-याकडील रहिवाशी प्रमाण पत्र अर्जासोबत जोडणे बंधनकारक राहील. तसेच महाराष्ट्र शासन साप्रवि विभाग क्रं. मकसी-1007/प्रक्र.-36/का-36 दि. 10 जुलै 2008 पासुन महाराष्ट्र कर्नाटक सिमाभागातील दावा केलेल्या 865 गावातील 15 वर्षा पासून रहिवासी असल्याचा त्यांच्या वास्तव्याचा सक्षम प्राधिका-यांच्या विहित नमुण्यात दाखला **थेट मुलाखतीच्या वेळी सादर करणे बंधनकारक राहील.**
8. **महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाने शासन निर्णय क्रं. एनव्हीसी-302002/1350/प्र.क्र.157/03/नवि-22 दिनांक 17 ऑगस्ट 2004 व महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक, क्रं. एसआरव्ही-2005/प्र.क्र.47/05/12 मंत्रालय मुंबई दिनांक 25 ऑगस्ट 2005 मधील कंत्राटी पदासाठी नमुद असलेल्या अटीशर्ती लागु राहतील.**
9. थेट मुलाखतीत पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी मनपाकेच्या नोटीस बोर्ड व वेबसाईडवर प्रसिध्द करण्यात येईल.
10. **ज्या उमेदवाराची निवड होईल अशा उमेदवारांनी नियुक्ती पुर्वी शासकीय सेवेकरिता आवश्यक असलेलली शारिरीक पात्रता विषय तपासणी करुन वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करावे लागेल.**
11. वरील उमेदवारांच्या नियुक्ती ही निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची असून कोणतेही कारण न दर्शविता किंवा पूर्व सूचना न देता सदरची नियुक्ती संपुष्टात आणण्याचे अधिकार विभाग प्रमुखास राहतील. सदर नियुक्ती विशिष्ट मर्यादित कालावधी करिता आहे त्यामुळे भविष्यात कोणत्याही प्रकारे सेवेत सामावून घेण्याची कार्यवाही करण्यात येणार नाही अथवा संबंधित उमेदवारांस असा कोणताही अधिकार असणार नाही.
12. सदर कंत्राटी नियुक्ती सोडावयाची झाल्यास रीतसर एक महिना पूर्व सूचना किंवा एक महिण्याचे मूळ वेतन जमा करुन राजिनामा मंजूर करुन घ्यावा लागेल.
13. वरील कंत्राटी कर्मचा-यांची नियुक्ती कंत्राटी पध्दतीने एकत्रित वेतनावरील निव्वळ तात्पुरत्या स्वरूपाची नियुक्ती असल्याने संबंधितांना आस्थापने वरील स्थायी अथवा अस्थायी पदासाठीचे असलेले कोणतेही लाभ अनुज्ञये राहणार नाहीत.
14. उमेदवारास थेट मुलाखतीसाठी स्वखर्चाने यावे लागेल व त्या बाबत कोणत्याही प्रकारचा मोबदला देण्यात येणार नाही.
15. जाहीरात पाहण्यासाठी **www.nwcmc.gov.in** या वेबसाईडचा वापर करणे.
16. **खालील उणिवा असलेले अर्ज नाकारण्यात येतील.**
    1) जाहिरातीच्या तारखेस विहित शैक्षणिक अर्हता / पात्रता / वय धारण न करणा-या उमेदवारांचे अर्ज.
    2) थेट मुलाखतीस आलेल्या उमेदवाराने शैक्षणिक अर्हतेच्या स्वसाक्षांकीत प्रती सादर न करणा-या उमेदवारांचे अर्ज.

3) वरील जाहीरातीत नमुद शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र, महाराष्ट्रचा रहिवाशी/कुटूंब मर्यादा प्रमाणपत्र/उमेदवार मागासवर्गीय जात प्रवर्गातील असल्यास व वयक्षमापनाचा लाभ घेत असल्यास त्यांनी जातीचे प्रमाणपत्र/जात वैधता प्रमाणपत्र इत्यादीच्या स्वसांक्षाकीत प्रती अर्जा सोबत सादर न करणारे उमेदवार थेट मुलाखतीसाठी अपात्र ठरतील.
4) वरील कारणास्तव उमेदवाराचा अर्ज कोणत्याही त्रुटीमुळे रद्द झाल्यास त्या बाबतच्या तक्रार अर्जाची कोणतीही दखल घेतली जाणार नाही अथवा त्या बाबत कोणताही पत्र व्यवहार केला जाणार नाही.

आयुक्त

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड
<u>"कंत्राटी कुस्ती शिक्षक/प्रशिक्षक"</u> या पदासाठी अर्ज

**प्रति,**
**मा.आयुक्त,**
**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड**

**विषय** - `कंत्राटी कुस्ती शिक्षक/प्रशिक्षक` पदासाठी अर्ज सादर करणेबाबत.
**संदीर्भ** - दैनिक-------------दिनांक---------- रोजी प्रकाशित झालेली जाहिरात.

उपरोक्त जाहिरातीच्या संबंधाने मी खालील स्वाक्षरीधारक - कंत्राटी कुस्ती शिक्षक/प्रशिक्षक या पदासाठी अर्ज सादर करीत आहे व त्यासाठी लागणारी माझी आवश्यक ती माहिती खालील प्रमाणे आहे.

1. उमेदवाराचे संपुर्ण नांव (आडनांव प्रथम) ---------------------------------------------

2. पत्र व्यवहाराचा सध्याचा संपूर्ण पत्ता ---------------------------------------------
---------------------------------------------
ता.---------- जि.----------पिन नं.------------
मोबाईल नं. --------------------

3. कायमचा पत्ता (संपूर्ण) ---------------------------------------------
ता.---------- जि.----------पिन नं.------------
मोबाईल नं. ---------------------

4. जात प्रवर्ग ---------------------------------------------

5. जात/पोट जात ---------------------------------------------

6. समांतर आरक्षण (असल्यास) ---------------------------------------------

7. जन्म दिनांक (अंकात) दिनांक--------महिना--------वर्ष----------------

8. जन्म दिनांक (अक्षरात) ---------------------------------------------

9. जाहिरातीच्या दिनांकास असलेले वय दिनांक-------महिना--------वर्ष----------

10. राष्ट्रीयत्व ---------------------------------------------

11. महाराष्ट्र राज्याचा रहिवासी आहे काय :- होय/नाही

12. लिंग :- पुरुष/स्त्री

13. शैक्षणिक अर्हता

| अ.क्र. | शैक्षणिक अर्हता | संस्थेचे/मंडळाचे नांव | प्राप्त गुणांची टक्केवारी | उत्तीर्ण वर्ष |
|---|---|---|---|---|
| 1 | | | | |
| 2 | | | | |

असे प्रमाणित करतो/करते की, मी `कंत्राटी कुस्ती शिक्षक/प्रशिक्षक ` या पदाकरीता अर्ज केला असुन मी जाहिरात योग्य रितीने वाचली असुन जाहिराती मधील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत. तसेच अर्जात नमुद केलेली माहिती खोटी आढळून आल्यास माझी उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल व त्यावर माझा कोणताही आक्षेप राहणार नाही. तसेच याबाबत नियुक्ती अधिकारी जो निर्णय देईल तो मला मान्य राहील.

ठिकाण -----------------

दिनांक ----------------- उमेदवाराची स्वाक्षरी

उमेदवाराचे संपुर्ण नांव--------------------------

---

**महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम 2005 मधील प्रतिज्ञापत्राचा नमुना-अ**

**प्रतिज्ञापत्र नमुना-अ - (नियम 4 पहा)**

मी,श्री/श्रीमती/कुमारी-------------------------------------------श्री ----------------------------
यांचा/यांची/मुलगा/मुलगी/पत्नी वय --------वर्ष, राहणार -------------ता----------जि----------
याव्दारे पुढील प्रमाणे असे जाहिर करतो/करते की, (1) मी `कंत्राटी कुस्ती शिक्षक/प्रशिक्षक` या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

(2) आज रोजी मला --------- (संख्या) इतकी हयात मुले आहेत, त्यापैकी दिनांक 28 मार्च 2005 नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ------आहे. (असल्यास जन्म दिनांक नमुद करावा)

(3) हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक 28 मार्च 2006 व तदनंतर जन्माला आलेल्या,मुलामुळे या पदासाठी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल याची मला जाणीव आहे.

वर नमुद केलेला तपशील माझ्या माहितीप्रमाणे सत्य व अचुक आहे मी असेही प्रामाणित करतो/करते की,वर दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळुन आल्यास नोकरी गमविण्यास व त्या अनुषंगाने होणा-या इतर कार्यवाहीस पात्र व बांधील राहील.

ठिकाण ------------------- सही

दिनांक -------------------

(उमेदवाराचे नांव---------------------------------)